# जाहीर प्रकटन

पुणे शहरातील सर्व नागरिकांना व अन्न उत्पादक, अन्न वितरण, अन्न साठवण, पिण्याचे पाणी, सुवेज वॉटर तसेच सर्व प्रकारच्या अन्न विक्री करणाऱ्या व्यवसायधारकांना कळविण्यात येते की, पुणे महानगरपालिकेमार्फत साळुंके विहार रोड, कमेला विभाग, कोंढवा, पुणे ४११ ०४८ या ठिकाणी उभारण्यात आलेल्या प्रयोगशाळेस भारत सरकारने मान्यता दिलेली आहे.

सदर प्रयोगशाळेस अन्न, पाणी, सुवेज वॉटर तपासणीचा दर्जा भारत सरकार यांच्यामार्फत दिनांक १३ जुलै २०१६ रोजी देण्यात आलेला आहे. सदरची प्रयोगशाळा ही मान्यताप्राप्त प्रयोगशाळा झालेली आहे. सदर प्रयोगशाळेचे मान्यता क्रमांक ३०/डब्ल्यू/एफ.एस.एस.ए.आय./२०१६ दिनांक १३ जुलै २०१६ असून सदर प्रयोगशाळेमध्ये तपासणी केलेले अन्न नमुना, पाणी नमुना, सुवेज वॉटर नमुना हे सरकारने ठरवून दिलेल्या मानांकनानुसार असून, सदरची तपासणी ही अन्न सुरक्षा व मानके कायदा २००६ व त्या अंतर्गत नियमानुसार असून सदर ठिकाणी तपासणी केलेले नमुने हे अन्न व औषध प्रशासनाकडून ग्राह्य धरण्यात येणार आहेत.

तरी सर्व नागरिकांना व व्यवसायधारकांना कळविण्यात येते की, आपल्याकडील अन्न नमुने, पाणी नमुने तसेच सुवेज वॉटर नमुने हे पुणे महानगरपालिकेच्या मान्यताप्राप्त प्रयोगशाळेतून तपासून घेण्यात यावेत. पुणे महानगरपालिकेकडील प्रयोगशाळेत अन्न नमुने तपासणी, पाणी नमुने तपासणी, सुवेज वॉटर नमुने तपासणी यांचे दर महाराष्ट्र शासनाने ठरवून दिलेल्या दराप्रमाणे आहेत.

सर्व नागरिकांना व व्यवसायधारकांना पुणे महानगरपालिकेमार्फत उपलब्ध करून देण्यात आलेल्या सदर प्रयोगशाळेचा उपयोग करून घ्यावा, असे जाहीर आवाहन पुणे महानगरपालिकेतर्फे करण्यात येत आहे.

कळावे,

डॉ. एस. टी. परदेशी
आरोग्य अधिकारी
पुणे महानगरपालिका

जाहिरात क्र. १/६६७, दि. २०-१२-२०१६